किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २०५/२०२४
भिमराव –वि– स्टेट
निशाणी क्र. २६ लगत

**<u>उलटतपास गैरअर्जदार यांच्या तर्फे विधीज्ञ श्री. पी. टी. सिरसाठ यांच्या मार्फत</u>**

०४. मला चार भाऊ असून दोन बहिणी आहेत. मी व भिमराव पगारे मौजे जालना येथेच राहण्यास आहे. आम्ही दोघेही सेवानिवृत्त आहोत. हे म्हणणे खरे आहे की, मौजे भोकरदन येथील नगर परिषद मालमत्ता क्र.३३६२ ही माझ्या वडिलांच्या नावे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मालमत्ता क्र.३३६२ च्या जागेवर गैरअर्जदार क्र.४ विजय व गैरअर्जदार क्र.३ राजेंद्र यांनी काही प्रमाणात बांधकाम केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, विजय व राजेंद्र यांनी केलेल्या बांधकामाव्यतिरीक्त मालमत्ता क्र.३३६२ मधील उर्वरित जागा पडीक आहे.

०५. हे म्हणणे खरे आहे की, मौजे भोकरदन येथील गट क्र.७३ब ही मिळकत माझे वडील किसन पगारे यांचे नावे होती. हे म्हणणे खरे आहे की, किसन पगारे मयत झाल्यानंतर सदरची मिळकत माझ्या नावे झाली. हे म्हणणे खरे आहे की, किसन पगारे यांच्या सर्व वारसांचा सदर मिळकतीमध्ये अधिकार आहे. मी सदर मिळकतीचा उल्लेख या कामी केलेला नाही. मला केवळ मालमत्ता क्र.३३६२ बाबत वारस प्रमाणपत्र हवे असल्याने मी सदर मिळकतीचा उल्लेख याकामी केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.७३ब ही मिळकत मला इतर वारसांना द्यायची नसल्याने मी त्याचा उल्लेख याकामी केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मालमत्ता क्र.३३६२ ची किंमत वाढल्याने आम्ही प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
स्वाक्षरीत/–
(मयुरेश आर. काळे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
भोकरदन

दिनांकः २८.०१.२०२६